ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. PNC-116 Licence No. 34

वर्ष ४० | पुणे, बुधवार, ७ आणि २१ ऑगस्ट १९७४ | अंक १५ आणि १६



"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**



**BANK TO BANK...**

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth**
**BELGAUM**


Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT,**
*General Manager.*



**IMPORT SUBSTITUTE**
**GADRE KEYS**



ALL TYPES AS
PER SPECIFICATION

**GADRE BROTHERS** MADHAVNAGAR
PHONE NO 2318 GRAM 'SEWA'



**Swastik FOAM**


cosy
sitting
pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ७ आणि २१ ऑगस्ट, १९७४


संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## सरकारी उत्पन्न वाढेल, पण महागाई कमी होईल का ?

### श्री. चव्हाणांचे तातडीचे करविधेयक : जालीम उपायांचा अभाव

अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी आपले करविधेयक ३१ जुलै रोजी सादर केले, त्यांत त्यांनी २३२ कोटी रुपयांची करवाढ सुचविली आहे. (त्यापैकी २२ कोटी रु. राज्यांना मिळतील) अर्थात, १२ महिन्यांतील करवसुलीचाही अंदाज आहे; ऑगस्ट १९७४ ते मार्च १९७५ ह्या मुदतीत १२३ कोटींची वसुली होईल.

करांच्या २३२ कोटी रु. पैकी एकट्या एक्साइजमधील वाढीमुळेच १६६ कोटी रु. जमा होणार आहेत. तांबे, जस्त, कृत्रिम धागे, कपास-सूत, टायर्स, सिमेंट, सिगारेट्स, कागद आणि पोलाद ह्यांच्या एक्साइजमध्ये बरीच वाढ करण्यात आली आहे. दीर्घ मुदतीच्या भांडवली नफ्यावर कराची आकारणी करताना करावयाच्या वजावाटीचा दर उतरविण्यात आला आहे. त्यामुळे बारा महिन्यांत ५ कोटी रु. मिळतील. प्रत्यक्ष करांचा प्रमुख भाग म्हणून शेड्यूल्ड बँकांच्या कर्जावरील व्याजाच्या मिळकतीवर ७% कर सुचविण्यात आहे. कर्जदाराकडून जास्त व्याज घेऊन बँका ह्या कराचा बोजा कर्जदारावर टाकतील, हे उघड आहे. कर्ज महाग करण्याचा उद्देश ह्या करामुळे साधेल आणि त्याचबरोबर सरकारला उत्पन्न मिळेल. कंपन्यांचे करपात्र उत्पन्न ठरविताना ह्या करापोटी द्यावी लागणारी रक्कम वजा घातली जाईल. बँकांच्या व्याजावरील करामुळे सरकारला बारा महिन्यांत ६० कोटी रु. (चालू वर्षी २५ कोटी रु.) मिळतील असा अंदाज आहे.

श्री. चव्हाणांच्या करविधेयकाविषयी उठलेल्या वावड्यांमुळे बरेच लोक अस्वस्थ झाले होते. त्यांचे विधेयक क्रांतिकारक असण्याची शक्यता वाटत होती. खुद्द अर्थमंत्र्यांनी आर्थिक परिस्थितीचे जे भीषण चित्र रंगविले, त्यामानाने त्यांची उपाय-योजना अगदीच फिकी वाटते. गेले कित्येक महिने दरमहा २.६% ह्या गतीने महागाई वाढत आहे, म्हणजे चलनवाढ बेसुमार होत आहे त्याची सरकारला जाणीव आहे. पण उपाय योजण्याचे धाडस कमी पडत असावे. आता सरकारच्या उत्पन्नात वाढ होईल हे नक्की, परंतु उत्पादनवाढीस चालना मिळण्याची त्यात तरतूद नाही. काळ्या बाजारामुळेच साठेबाजी आणि नफेबाजी वाढते, परंतु काळ्याबाजारवाल्यांना ह्या बजेटामुळे किंवा तज्जन्य उपायामुळे भिण्याचे कारण दिसत नाही. सरकारने प्रत्यक्ष करात फारच थोडी वाढ केली असल्यामुळे व्यापारी वर्गाला हायसे वाटत आहे. बँकांच्या कर्जांच्या व्याजाच्या मिळकतीवरील करात सहकारी बँका वगळण्यात आल्या आहेत. महागाईभत्ता, धान्यासाठी सबसिडी योजना, खर्चात वाढ, ह्या बाबी अपरिहार्य दिसतात. शेती क्षेत्रावर प्राप्ति-कर बसविण्याचे धाडस सरकारने केल्याखेरीज सरकारी उत्पन्न-खर्चातील तूट भरून निघणे अशक्य आहे.

---

## मुंबईचे २००० सालचे विदारक चित्र

मोठी शहरे आणि त्यांच्या परिसराचा अभ्यास करणाऱ्या एका तज्ज्ञाने मुंबई शहराचे इ. स. २००० चे चित्र असे रंगविले आहे. मुंबई शहरात रोज ३०० लोक नव्याने येत असतात. कलकत्ता शहराशी तुलना करता मुंबईची वाढ दुप्पट वेगाने होत आहे. शहराच्या सुखसोयी राखण्यासाठी सध्या जी साधने उपलब्ध आहेत ती २५ लाख लोकांच्या किमान गरजा भागविण्याइतकीच आहेत. आजच शहरात ह्याच्या दुप्पट लोक कसेबसे राहात आहेत. लोकसंख्येचा लोंढा शहराकडे असाच येत राहिल्यास इ. स. २००० च्या सुमारास त्याची लोकसंख्या १.३ कोटीच्या घरात जाईल. ह्या फुगलेल्या बृहन मुंबईत राहण्याच्या जागेचा तुटवडा २० लाख गाळ्यांच्या आसपास असेल. शहराच्या रस्त्यावरून २ लाख वाहने धावत राहतील, आणि पाण्याचा पुरवठा रोज १०० कोटी गॅलन इतका जरी वाढविण्यात आला तरी पाण्यासारखी आवश्यक वस्तू रोज ५० कोटी गॅलन्सनी कमी पडेल. एकंदरीने देशाचे शहरीकरण पराकोटीला जात आहे. आजच शहरातील ५० टक्के लोक आणि ग्रामीण भागातील ४० टक्के लोक दारिद्र्यात जगत आहेत. त्यातही शहरातील गरिबांची परिस्थिती खेड्यातील गरिबांच्या परिस्थिती-पेक्षा अधिक वाईट आहे. इ. स. २००० च्या सुमारास कलकत्ता व त्याच्या भोवतालील परिसर ह्यात २.३ कोटी लोक राहू लागलेले असतील. मद्रास, बंगलोर, दिल्ली, लखनौ, कानपूर ह्या मोठ्या शहरांतील लोकवस्तीही अतिशय दाट झालेली असेल. देशांतील २० मोठ्या शहरांची लोकसंख्या १० लाखांच्या वर गेलेली असेल. त्याशिवाय आणखी १०० मोठी शहरे नव्याने स्थापन झालेली असतील.

## कर्जेवाढ, थकबाकीवाढ; उत्पादनात मात्र घट : इंदिराजींनी ओढलेले कोरडे

"राष्ट्रीयीकृत बँका शेतकऱ्यांना कर्जे देण्याच्या बाबतीत चालढकल करतात, तेव्हां त्यांच्या वृत्तीत सुधारणा घडवून आणा" असे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक ह्यांनी पंतप्रधान इंदिराजींना सांगितले, तर "शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जात खूप वाढ होऊनही महाराष्ट्रात शेतीचे उत्पादन कमालीचे घटले आहे. १९६०–६१ पासून ते घसरत चालले आहे, तेव्हा जरा आत्मसंशोधन करून कसून कामास लागा" असे पंतप्रधानांनी त्यांना स्पष्टपणे बजावले. ह्या संदर्भात रिझर्व बँकेच्या अभ्यास समितीने सहकारी क्षेत्रातील वाढत्या, प्रचंड थकबाकीविषयी चिंता व्यक्त करून उपाय सुचविले आहेत, ते महत्त्वाचे आहेत.

३१ जुलै १९७३ अखेर संपलेल्या वर्षात केवळ प्राथमिक कृषी कर्जपुरवठा सोसायट्यांची कर्जांची एकूण थकबाकी ३७७ कोटी रु. एवढी आहे. त्यापैकी २७७ कोटी रु. म्हणजे अजमासे ७५ टक्के थकबाकी ही जाणूनबुजून न फेडण्यामधून निर्माण झालेली आहे. अशा लोकांकडून थकबाकी सक्तीने वसूल करण्याविषयक उपाययोजना उशिरा करण्यात येतात व त्या पुरेशा नाहीत असे अभ्यास समितीला आढळून आले आहे.

या वाढत्या थकबाकीबद्दल बँकेच्या संपूर्ण संचालक मंडळास जबाबदार धरावे. विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक थकबाकी झाल्यास बँकेच्या संपूर्ण संचालक मंडळाला आपोआप 'अपात्र' ठरविण्याच्या दृष्टीने राज्य सरकाराच्या सहकारी सोसायट्याविषयक कायद्यात दुरुस्ती करावी. प्राथमिक सोसायट्यांची आर्थिक देखरेख ही मध्यवर्ती सहकारी बँकेची जबाबदारी असावी. या बँकेस प्राथमिक सोसायट्यांच्या थकबाकीदारावर थेट कारवाई करण्याचा अधिकार असावा, सोसायटीच्या सभासदाकडे वर्षापेक्षा अधिक काळ थकबाकी असेल तर त्यास सर्वसाधारण सभेमध्ये मतदान करण्यास वा प्राथमिक सहकारी सोसायट्यांच्या निवडणुकीत भाग घेण्यास अपात्र ठरविण्यात यावे. त्यासाठी सहकारी सोसायट्यांच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करावी.

सहकारी सोसायट्यांची थकबाकी ठेवणाऱ्यांना सरकारने कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही पद्धतीने मदत करू नये. थकबाकीदाराच्या मालमत्तेचा लिलाव करतेवेळी कोणी 'बोली' करणारा नसला तर राज्य सरकारने स्वतः लिलावात असलेली जमीन खरेदी करावी, अशाही शिफारशी या अभ्यास समितीने केल्या आहेत.

---

**इं. फि. कॉर्पोरेशनची कर्जे**—इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनने जून, १९७३ अखेर ६२१ औद्योगिक संस्थांना ४३९·८२ कोटी रु. ची कर्जे मंजूर केली. जून, १९७३ अखेर संपलेल्या वर्षी ४६·१५ कोटी रु. ची ९० कर्जे देण्यात आली. जून १९७३ अखेर ५५·६ रु.ची कर्जे थकलेली आहेत.

**राजकीय पक्षाला देणगी व्यवसायाला आवश्यक खर्च नाही**—एल्फिन्स्टन स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स कं. लि. ने १९५७ मध्ये २१,००० रु. मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीला देणगी म्हणून दिले. ही रक्कम इन्कमटॅक्सच्या दृष्टीने व्यवसायाला आवश्यक खर्च ठरत नाही, असा मुंबई हायकोर्टाने निवाडा केला. इन्कमटॅक्स कायद्याच्या १० (१) किंवा १० (२) (XV) कलमाखाली हा खर्च, 'रेव्हेन्यू खर्च' मानता येणार नाही. आतापर्यंत अनेक हायकोर्टांनी ह्यापूर्वी असाच निवाडा केलेला आहे.

**ठेवींना बंदी**—कंपनी कायद्याखाली न येणाऱ्या सर्व बिगर बँकिंग संस्थांना ठेवी घेण्यास बंदी करण्याचे अधिकार घेऊन त्यासंबंधातील कायदेकानू अधिक कडक करण्याचा सरकारचा विचार आहे.

**नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेची चौकशी**—नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेने चुकविलेल्या कराबाबत तक्रारींची चौकशी सरकार करीत आहे. बँकेच्या जिंदगीच्या घसाऱ्याची जादा तरतूद, इंग्लंडमध्ये स्थायिक झालेल्या बँक नोकरांची इन्कमटॅक्स करचुकवी, बँकेने स्वतःच्या बड्या अधिकाऱ्यांना दिलेल्या बक्षिशींच्या चुकीच्या किमती, इन्कमटॅक्स कापून न घेणे, काही खर्चाबाबत खोट्या मागण्या, इत्यादी स्वरूपाच्या त्या तक्रारी आहेत. १९७३ अखेर बँकेकडे ३७६ कोटी रु. च्या ठेवी आहेत.

**दादासाहेब फाळके पारितोषिक**—यंदाचे दादासाहेब फाळके पारितोषिक सुलोचना (रुबी मेयर) ह्या अभिनेत्रीला मिळाले आहे. सुलोचनाच्या चालू आजारपणात आणि आर्थिक दुःस्थितीत पारितोषिकाची रक्कम तिला उपयोगी पडेल.

**नॅशनल बँकिंग सर्व्हिस कमिशन**—राष्ट्रीयीकृत बँकांतील अधिकारी आणि कारकून ह्यांच्या जागा भरण्यासाठी नॅशनल बँकिंग सर्व्हिसची स्थापना करणारे एक बिल पार्लमेंटात मांडण्यात येणार आहे. बँकिंग कमिशनने अशा सर्व्हिस कमिशनची सूचना १९७२ मध्येच केली होती, पण तिने दोन कमिशन्स सुचविली होती—एक स्टेट बँक ऑफ इंडियासाठी आणि दुसरे राष्ट्रीयीकृत बँकांसाठी. पण दोन्हींसाठी मिळून एकच बँकिंग सर्व्हिस कमिशन स्थापण्याचा सरकारचा विचार आहे.

**राष्ट्रीय उद्यान स्थगित**—राजस्थानमधील जेसलमीर जिल्ह्यात एक राष्ट्रीय उद्यान तयार करण्याचा विचार भारत सरकार करीत होते. उद्यानासाठी राजस्थान सरकारने पोखरन् आणि जेसलमीरच्या दरम्यान २५० चौरस मैलांचा टापूही देऊ केला होता. ५ व्या पंचवार्षिक योजनेत उद्यानाचे काम चालू होणार होते. परंतु आता ते स्थगित करण्यात आले आहे.

**अभ्रकाचा साठा**—मध्य प्रदेशातील रायचूर जिल्ह्यातील दोन गावांजवळ अभ्रकाचे साठे सापडल्याचे वृत्त आहे. साठ्याचा अंदाज घेण्यासाठी भारत सरकारच्या भूस्तर व खाणखात्याने आपले अधिकारी तिकडे पाठविले आहेत. त्यांच्या पाहणीनंतर अभ्रकाच्या साठ्याचा अंदाज करता येईल.

# राष्ट्रीयीकृत बँकांचा पंचवार्षिक ताळेबंद

## फायदे आणि उणिवा

लेखक : वसंतराव पटवर्धन, जॉईंट जनरल मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र

### फायदे

(१) बँकांच्या शाखांत अभूतपूर्व अशी वाढ झाली. १९६९ साली व्यापारी बँकांच्या एकूण शाखा ८,३२१ होत्या. त्या सप्टेंबर १९७३ अखेर १५,७७१ झाल्या. आता त्या १६,५०० च्या वर आहेत.

(२) नव्या निघालेल्या ८,००० शाखांपैकी ४,००० शाखा ग्रामीण भागांत आहेत. नव्या शाखा जिथे निघाल्या तिथल्या ४,२०० गावांत पूर्वी व्यापारी बँकेची एकही शाखा नव्हती.

(३) ग्रामीण विभागांतील शाखांतूनही ठेवी गोळा होऊ शकतात हे सिद्ध झाले. अशा २,७०० शाखांनी त्यांच्याकडे १६० कोटी रु. च्या ठेवी गोळा झाल्याचे कळवले आहे. नव्या ग्रामीण शाखेत सरासरी ६ लक्ष रु., निमशहरी शाखेत १२ लक्ष रुपये, शहरी शाखेत २६ लक्ष रु. व राजधान्या व मुंबई, कलकत्ता यांसारख्या मोठ्या महानगरांतील शाखेत ४० लक्ष रु. ठेवींची सरासरी पडल्याचे दिसते.

(४) राष्ट्रीयीकरणाचे वेळी दर ६५,००० लोकांमागे एक शाखा असे प्रमाण होते. ते आता दर ३५,००० लोकांमागे एक शाखा असे झाले आहे.

(५) पाच वर्षांपूर्वी फक्त महाराष्ट्र व तामीळनाडूत १,००० च्या वर बँकशाखा होत्या. त्यांच्या जोडीला आता आंध्र, गुजराथ, कर्नाटक, केरळ व उत्तर प्रदेश हीही राज्ये आली आहेत.

(६) लघु उद्योगांना १९६८ मार्चमध्ये एकूण कर्जाच्या सात टक्के कर्जाच्या रकमेचे प्रमाण होते. ते आता १४ टक्क्यांवर गेले आहे. रक्कम प्रत्यक्षात २१० कोटींवरून ७०० कोटींवर गेली आहे. कर्ज घेणाऱ्या लहान कारखान्यांची संख्या ५१,००० वरून १,७५,००० इतकी झाली आहे.

(७) शेतीत अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष कर्जवितरणाची टक्केवारी ९ टक्क्यांपर्यंत पोचली. प्रत्यक्ष रक्कम २३७ कोटी रुपये व अप्रत्यक्ष २७० कोटी रुपये अशी आहे. एकूण कर्जदार शेतकऱ्यांची संख्या १,६४,००० वरून १३·६ लक्ष इतकी झाली आहे.

(८) निर्यात व्यापाराची कर्जे २५८ कोटींवरून ६०० कोटी रुपयांवर गेली आहेत, तर वाहन व्यवहारातील कर्जे साडेपाच कोटी रुपयांवरून ६५ कोटी रुपयांवर गेली आहेत. स्वयंसेवितांना २ कोटी रुपयांऐवजी आता २२ कोटी रु. सर्चवितरण झाले आहे.

(९) सार्वजनिक बँकांनी पूर्वक्रम विभागाला पाच वर्षांपूर्वी १५ टक्के इतकेच कर्ज दिले होते. ती टक्केवारी आता जवळजवळ दुप्पट झाली आहे.

(१०) लहान कर्जदारांची संख्या वाढली आहे. पर्यायाने मोठ्या कर्जदारांची संख्या कमी झाली आहे.

(११) १,७०,००० पंपसेट, २८,००० ट्रॅक्टर्स, ६०,००० विहिरी, ५०,००० गाईम्हशी, ३०,००० टॅक्सी व ट्रक, १,५७० सहकारी सोसायट्या व सोसायट्यांतील नवे ८३,००० सदस्य इतक्या नव्या प्रकरणांना राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्जे मिळाली.

(१२) सार्वजनिक संस्था म्हणून राष्ट्रीयीकृत बँकांतील व्यवहार आता सामान्य लोकांपासून लोकसभेपर्यंत चर्चिले गेल्याने चुका सुधारण्याची, दोष टाळण्याची व अधिकाऱ्यांवर नियंत्रण येण्याची चांगली शक्यता निर्माण झाली आहे.

(१३) बँकव्यवसाय हा एक अर्थकारणाचा प्रमुख भाग आहे याची जाणीव सर्व स्तरांवर निर्माण झाली. पूर्वी बँका या मोठ्या लोकांसाठी किंवा बचत टाकू शकणाऱ्यासाठी अशी जी भावना होती ती संपूर्ण नाहीशी झाली आहे.

(१४) बँकांमध्ये पतनिरीक्षण, ठेवी यांत नवीन नवीन प्रयोग अत्यल्प प्रमाणात का होईना सुरू झालेले आहेत. मनुष्याऐवजी प्रकल्प, व्यवसाय यांना मानले पाहिजे ही चांगली प्रवृत्ती निर्माण झाली.

(१५) डिफरेन्शियल इंटरेस्ट स्कीमसारख्या गरीब व गरजू माणसासाठी योजना निर्माण झाल्या. सुमारे दोन लक्ष लोकांना त्यामुळे अंदाजे १० कोटी रु. चे कर्ज सवलतीने मिळू शकले.

### उणिवा

(१) राष्ट्रीयीकरणानंतरची सर्व वाढ-विशेषत: शाखा व ठेवी यांबाबत संख्यात्मक आहे; गुणात्मक नाही. अनेक शाखा पाहिजे आहेत की नाही याचा अभ्यास न करता काढल्या गेल्या. त्यांच्यापैकी बऱ्याच शाखांचा तोटा कमी करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न झालेले दिसत नाहीत.

(२) ग्रामीण शाखांतून वेगवेगळ्या प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व्हायला पाहिजेत ते होत नाहीत. केवळ शेतीला कर्जपुरवठा येवढेच त्या शाखांचे स्वरूप झालेले आहे. ठेवी तर पोस्टकचेऱ्यांतर्फेही गोळा होत होत्याच. त्या दृष्टीने जनतेस बँकेचे संपूर्ण कार्य काय असते त्याचे शिक्षण यायला हवे.

(३) प्रकाच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांतील अनावश्यक स्पर्धा व खर्च टाळण्याचे प्रयत्न होत नाहीत. याबाबत वाटेल तितका वाव आहे.

(४) ज्या ज्या वर्गाने राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार केला होता त्यांनी ते झाल्याबरोबर जातीने व जोखीम ओळखून ते राबवण्याची तयारी दाखविलेली नाही. उदा० अनेक राज्यांनी अजूनही राजकारण म्हणून तलवार समितीचा अहवाल मान्य करून त्या दृष्टीने पावले टाकलेली नाहीत. नमुनेदार बिलाचा कायदा झालेला नाही. किसान पासबुकाची कल्पना अनेक राज्यांत तरी कागदावरच राहिलेली आहे. जिल्हा नियोजनमंडळ आणि बँकांची कन्सल्टेटिव्ह किंवा कोऑर्डिनेटिंग कमिटी यांत एकवाक्यता नाही. दोन्हींपैकी एकाची जरुरी नाही. जिल्हा नियोजन मंडळावर अनेक ठिकाणी बँकांना प्रतिनिधित्वही नाही. राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्जे मिळवीत याच भूमिकेतून सहकारांनी

तरी अनेक महामंडळांची स्थापना करण्याचे प्रयोग चाललेले दिसत आहेत. राज्यांतून बँकांच्या कार्याला मदत देण्यासाठी ज्या सेवाक्षेत्रांची जोड हवी ती अभावाने दिसून येते.

(५) सामान्य जनतेला रिझर्व बँक व डिपार्टमेंट ऑफ बँकिंगचा समन्वय कसा होतो ते कळत नाही.

(६) पतनियमन प्रभावी झालेले नाही. किंबहुना बाल्यावस्था, प्रयोग, अशाच नावाखाली सर्व समर्थनात्मक भूमिका निर्माण होत असलेल्या दिसत आहेत. अनेक संस्थांतील धोरणांत समन्वय दिसत नाही.

(७) कर्मचाऱ्यांमध्ये बँकेचे व्यवहार राष्ट्रहितासाठी चालले पाहिजेत ही जाणीव सर्व स्तरांवर दिसत नाही. राष्ट्रीयीकरणानंतर जी जबरदस्त प्रेरणा निर्माण व्हायला हवी होती ती झालेली नाही. प्रकरणातील कालापव्यय आता चिंतेचा विषय होऊन राष्ट्रीयीकरणाऐवजी सरकारीकरण झाले की काय, अशी शंका वाटू लागलेली आहे.

(८) जिल्हापातळीवर नियोजन मान्य होऊनही त्याचा केवळ देखावा निर्माण होत आहे. जिल्ह्याचे जे पाहणी-अहवाल केले गेले त्यावर प्रचंड खर्च होऊनही प्रत्यक्षात जुनी, अपुरी, समन्वय नसलेली, आकडेवारी असलेली असे शोभेचे अहवाल असेच त्यांचे स्वरूप झाले. व त्यानंतर तर ते कचरापेटीतच गेलेले दिसतात. बँका जिल्ह्याचा विकास कसा करता येईल याबद्दल सर्वत्रच दक्ष आहेत असे दिसत नाही.

(९) राष्ट्रीयीकरणानंतरही भारतीय बँकिंगचे स्वरूप काय असावे याबद्दल चाचपडणेच चालू आहे. बँकिंग कमिशन कालबाह्य होऊनही चालू ठेवले गेले व त्यांचा अहवाल आल्यानंतर किरकोळ तांत्रिक बाबींचा स्वीकार वगळता जनतेच्या दृष्टीने तो बासनातच गुंडाळला गेला आहे.

(१०) एकसूत्रीकरण झालेले नाही. सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी हत्यार अशा रीतीने बँकांचा उपयोग करून घेतला जात नाही. अनेक दबावांची शक्यता निर्माण झालेली आहे. प्रादेशिक असमतोल घालविण्याबाबत बुद्धिपुरस्सर प्रयत्न झालेले नाहीत.

(११) देशाची पंचवार्षिक योजना पार्श्वभूमीसाठी ठेवून बँकिंगची पंचवार्षिक योजना आखली गेलेली नाही. ३५,००० कोटी रुपयांचे राष्ट्रीय उत्पन्न व १०,००० कोटी रुपयांच्या ठेवींची बँक व्यवसायात पुरेशी सांगड नाही.

(१२) शेतीबाबत बँका अजूनही उदासीनच दिसतात. लोकशिक्षण कमी पडत असल्याने शेतकरी बँकांचा पुरा उपयोग करून घेत नाहीत असे दिसते. जे घेत आहेत ते पूर्वी कुठेतरी कर्ज घेणारेच मोठ्या प्रमाणावर असल्याने राष्ट्रीयीकृत बँकांमधीही थकबाकी ही डोकेदुखी निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्यांची वसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांना रास्त संरक्षण मिळायला हवे.

शेतीच्या कर्जाची योग्य ती मुदत थोडीफार दीर्घच ठरवली गेली पाहिजे. चांगल्या वर्षात वसुली जास्त झाली तर दुष्काळी वर्षातले हप्ते आधीच येऊ शकतील. पण चांगल्या सुगीत खर्च करून, दुष्काळात अडचणी सांगायच्या किंवा सर्वांनीच त्याचा फायदा उठवायचा ही दुष्प्रवृत्ती निर्माण होता कामा नये. बँकांच्या खालील स्तरावरील अधिकाऱ्यांनी शेतीत जास्त लक्ष घालून शेतकऱ्यांच्यात मिसळून त्यांचे शिक्षण करण्याची जबाबदारी आपण होऊन घेतली पाहिजे. त्यांची शक्ती ही विधायक कार्यासाठी वेचली गेली पाहिजे.

(१३) राष्ट्रीयीकरण करताना पन्नास कोटी रुपयांवरील बँका जर घेतल्या गेल्या तर नंतर त्या आकाराला आलेल्या बँका का घ्यावयाच्या नाहीत याबाबत तर्कसंगत विचारधारा प्रसृत होत नाही. खासगी बँकांचीही आवश्यकता आहे, आपली अर्थव्यवस्था संमिश्र आहे, स्पर्धेने कौशल्य वाढते, मक्तेदारी टळते, ही विधाने मोघम वाटतात. त्यांचा सर्वांगीण विचार आता पाच वर्षांनंतर तरी झाला पाहिजे. स्टेट बँक समूह व राष्ट्रीयीकृत बँका हे सार्वजनिक क्षेत्रातही दोन प्रवाह का आहेत, त्यात फरक कुठला, वगैरेंबाबत तज्ज्ञही बुचकळ्यात पडतात. बँकिंगच्या शिक्षणक्षेत्रातही असेच द्वैत आहे.

(१४) शाखांतील प्रादेशिक असमतोल अजून नाहीसा झालेला नाही. भारताचा पूर्व विभाग, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश इथे अजूनही विकासाला वाव आहे. तसेच महानगरात शाखाविस्ताराचे अस्थायी प्रयत्न न होता आखीव प्रयत्न व्हायला हवेत. शाखांसाठी अनिर्बंध भाडी द्यावी लागतात ती कमी व्हावीत, म्हणून कुठेतरी सार्वजनिक उपयोगासाठी वैध भाड्याने जागा ताब्यात घेण्याचे प्रयोग उशीर न लावता व्हायला पाहिजेत.

(१५) राष्ट्रीकरणानंतरही अनेक आर्थिक संस्था सरकारी मालकीच्या असूनही सध्याच्या कॉलमनीसारखे वातावरण जे निर्माण झाले आहे ते बँक उद्योगाला व पर्यायाने उद्योग व राष्ट्रविकासाला पोषक ठरणारे नाही. त्यामुळे राष्ट्रीयीकरणानंतर किमान शिस्त व स्वागतार्ह बदल होतील ही आशा फोल ठरली आहे. परिस्थिती खेचोळ तसे आपण खेचले जातच आहोत.


—लोकप्रतिनिधी

## बेबी फूड्सचा अपप्रचार

मातांनी आपल्या अर्भकांना अंगावर पाजण्याऐवजी त्यांना बेबी फूड्सवर वाढविण्याची प्रवृत्ती वाढत आहे, त्यामुळे बालमृत्यू आणि वाढ नीट न होणे असे प्रकार घडत आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केले आहे. बेबी फूड्सच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींचे नियंत्रण करण्याची वेळ आली आहे. मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासास स्तनपानाइतके उत्कृष्ट सकस अन्न नाही, परंतु बेबी फूड्सचे जाहिरातदार "आईच्या अंगावरील दुधापेक्षा मुद्दाम तयार केलेले पर्यायी दूध अधिक चांगले" असा प्रचार करीत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने विशेषतः अविकसित देशांना धोक्याची सूचना देऊन बेबी फूड्सचा अपप्रचार थांबविण्यासाठी जरूर तर कायदे करण्यास सांगितले आहे.

एक अभिनव उपक्रम :

# विद्या सहकारी बँक लि.



प्रा. वि. प. पटवर्धन ( अध्यक्ष )

लेखक :
प्रा. श्री. ग. बापट
( संचालक मंडळ सदस्य )

बँकेच्या उद्घाटनाचा समारंभ नुकताच थाटाने साजरा झाला. माननीय श्री. चिं. वि. जोग अध्यक्षस्थानी होते व प्रसिद्ध उद्योगपती श्री. नवलभाई फिरोदिया यांनी प्रमुख पाहुणे या नात्याने बँकेच्या कार्याचे उद्घाटन केले सुमारे ६०० भागधारक व निमंत्रक या कार्यक्रमास उपस्थित होते. अशा प्रकारची बँक चालू करावी असा विचार ७-८ महिन्यांपूर्वी पुण्यातील कॉलेजांतील काही प्राध्यापकांच्या मनात आला आणि ही विद्या सहकारी बँक म्हणजे त्याच विचाराने घेतलेले मूर्तस्वरूप होय.

## समाजहित आणि भागधारकांना आर्थिक लाभ ह्यांचा समन्वय

शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींचा प्रेरक व पुरस्कर्ते म्हणून संबंध असलेल्या ह्या बँकेच्या उद्दिष्टात अर्थातच शिक्षकांच्या काही विशेष गरजा पाहणे हा एक उद्देश आहे. अशा प्रकारच्या गरजांमध्ये उच्च शिक्षण, संशोधन, ग्रंथलेखन, प्रकाशन, इत्यादी शिक्षकांच्या, तसेच उच्च व माध्यमिक शिक्षणासाठी लागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वित्तप्रबंधाच्या गरजांचाही समावेश होतो. मात्र हे येथे मुद्दाम सांगितले पाहिजे की ही बँक फक्त शिक्षकांचीच किंवा फक्त शिक्षकांसाठीच नसून ती सर्व जनतेसाठी आहे व जास्तीत जास्त सोयी व सेवा उपलब्ध करून देणे हा आमच्या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. समाजातील निरनिराळ्या स्तरांतील लोकांना अनेक प्रकारचे द्रव्यसाहाय्य विविध कारणांसाठी लागते. लहान व्यापारी, उद्योगी, शासक, व्यवसायातील मंडळी, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, इंजिनिअर्स, कलावंत इत्यादींना पैसा लागत असतो आणि मोठमोठ्या व्यापारी बँकांकडून त्यांची नेहमी गरज भागतेच असे नाही. अशा क्षेत्रांत विद्या सहकारी बँक नम्रपणे लोककार्य करू इच्छिते. अर्थातच ही बँक शेकडो भागधारकांच्या उदार द्रव्यसाहाय्याने निर्माण झाली असल्याने त्यांचे हित साधत असतानाच वर उद्देशिलेली समाजसेवा बँकेला करावयाची आहे. समाजहित आणि भागधारकांना आर्थिक लाभ ह्यांचा मनोज्ञ समन्वय साधणे हेच आमच्या बँकेचे ध्येय राहील.

## अनुभवी आणि तज्ज्ञ नेतृत्व

आम्हाला को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या रजिस्ट्रारनी को-ऑपरेटिव्ह बँक काढण्याची परवानगी १ नोव्हेंबर १९७३ रोजी दिली. आम्हांस सांगण्यास आनंद वाटतो की त्या दिवसापासून अवघ्या साडेचार महिन्यात बँकेचे प्रवर्तक सुमारे आठशे भागधारकांकडून १ लाख, २० हजार रुपये भांडवल गोळा करू शकले. आमच्या बँकेच्या सल्लागार मंडळावर श्री. अप्पासाहेब जोग, प्रा. वि. म. दांडेकर, प्राचार्य डॉ. सी. जी. वैद्य, श्री. मुकुंदराव ओगले, डॉ. आर. जी. काकडे, डॉ. एम. डी. आपटे, श्री. द. शं. जमदग्नी, श्री. शांतीलाल शहा, डॉ. एस. व्ही. भावे, ह्यांच्यासारखी अनुभवी व तज्ज्ञ मंडळी लाभली आहेत. बँकेच्या पहिल्या संचालक मंडळावर पुढील सदस्य आहेत: प्रा. प. वि. तथा भाऊसाहेब पटवर्धन (अध्यक्ष), प्रा. वि. अ. जोशी (उपाध्यक्ष), डॉ. आनंद नाडकर्णी, प्रा. शि. श्री. काळे, प्रिं. एम्. टी. पवार, श्री. एन्. टी. किटेकर चार्टर्ड अकाउंटंट, श्री. विक्रम मेहता, प्रा. व्ही. आर. शिरगुरकर, प्रा. श्री. ग. बापट, श्री. हेमंत जोशी, प्रा. सु. पुं. पाठक, प्रा. एच. के. देशमुख आणि श्री. प. व्ही. भट. संचालक मंडळात प्राध्यापक, विद्यार्थी, कारखानदार व लघुउद्योजक या सर्वांचाच समावेश आहे हे सहज लक्षात येईल.

सुजाण धनसंचयेच्छू नागरिक आमच्या ह्या नव्या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद देतील असा चालकांना भरवसा वाटत आहे. त्यातून भरपूर ठेवींचा आधार मिळून आपले कर्जदानाचे कार्य बँकेला करणे अगदी लवकर व सुकर होईल अशी खात्री वाटते. हे सहकार्य व ही सहानुभूती जनतेकडून आम्हांला उदंड लाभेल अशी खात्री वाटते. सध्याच्या बँकेचे कार्यालय गोखले हॉस्पिटल शेजारी, हिरालाल मेहता, औषधांचे व्यापारी, ह्यांच्या माडीवरील जागेत, ३७५ सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, येथे आहे. बँकेने लक्ष्मी रोडवरच जुन्नरकर दत्तमंदिराच्या जागेत होणाऱ्या चार मजली इमारतीत पहिल्या मजल्यावर मोठी कायमची जागा मिळविली आहे. ही नवी इमारत ४-६ महिन्यांत तयार होताच आपले कार्यालय तिकडे हलविण्यात येईल.

## शैक्षणिक कर्जे

बँकेचे एक वैशिष्ट्य म्हणजे जून-जुलै महिन्यांत सर्वच मध्यमवर्गीय पालकांना फी, वह्या, पुस्तके, गणवेश, अशा प्रकारचे खर्च त्वरित करावे लागतात. बँकेने ही गरज लक्षात घेऊन रु. ५००-०० पर्यंत शैक्षणिक कर्जे देऊ केली आहेत. ही योजना अर्थातच लोकप्रिय होत आहे. ( सध्या ही योजना भागधारकांपुरतीच मर्यादित आहे. ) बँकेत स्वीकारल्या जाणाऱ्या बचत व मुदत खात्यातील व्याजांचे दर इतर बँकांतील दरांशी तुल्यबळ व आकर्षक ठेवण्यात आले आहेत त्यांचा ग्राहक भरपूर फायदा घेतील अशी आशा आहे.

## हिंदी मालाची पूर्व युरोपीय देशांना गरज

भारत सरकारचे एक व्यापारी मंडळ पूर्व युरोपातील देशांचा दौरा करून तेथे हिंदच्या मालाच्या निर्यातीला कितपत वाव आहे ते अजमावण्यासाठी गेले होते. भारत सरकारच्या व्यापारी खात्याचे दुय्यम मंत्री मि. ए. सी. जॉर्ज ह्यांनी मंडळाचे नेतृत्व केले होते. मंडळाने झेकोस्लोव्हाकिआ आणि हंगेरी ह्या देशांना भेटी दिल्या. ह्या दोनही देशांतर्फे मंडळाला असे आश्वासन देण्यात आले की ग्राहकोपयोगी अनेक प्रकारच्या मालाची उभयता देशांना गरज असून ती भागविण्याचे कामी भारत बरीच मदत करू शकेल. शिवाय भारतात तयार झालेल्या कारखान्यांच्या पक्क्या मालालाही चांगली बाजारपेठ मिळू शकेल. झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारने आपल्या गरजा मंडळाला कळविल्या. शिवण्याची यंत्रे, ट्रँझिस्टर रेडिओ, इत्यादी प्रकारच्या मालाला झेकोस्लोव्हाकिआत बाजारपेठ मिळू शकेल. कारण, तेथे कामगारांचा तुटवडा असल्याने ग्राहकोपयोगी वस्तू तयार करणे परवडत नाही. कामगारांचा तुटवडा असल्याने त्यांना मजुरी चढत्या दराने द्यावी लागते आणि उत्पादनाचा खर्च वाढतो. भारतात त्यामानाने मजुरी स्वस्त आहे. उलटपक्षी झेकोस्लोव्हाकिआने भारताला काही प्रकारचा माल पुरविण्याची हमी घेतली आहे. पोलाद, वृत्तपत्राचा कागद, रसायने, इत्यादी माल झेक देश भारताला ठरल्याप्रमाणे पुरविणार असल्याचे मंडळाला सांगण्यात आले. पश्चिम युरोपीय देशांना माल निर्यात करण्यास भारताला अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. अशा वेळी पर्यायी बाजारपेठ शोधण्याच्या प्रयत्नांचे स्वागतच करण्यात आले पाहिजे.

---

## आसाममधील चहाचे मळे बंद पडू लागले

आसाम सरकारकडे आलेल्या माहितीवरून राज्यांतील २८ चहाचे मळे बंद होण्याच्या मार्गावर आहेत, आणि त्यामुळे हजारो कामगार बेकार होण्याचा धोका उत्पन्न झालेला आहे. राज्यांतील चहाच्या मळ्यांची परिस्थिती बिघडत चाललेली आहे. गेल्या ८ वर्षांत १७ मळे बंद करण्यात आले. परंतु त्यांतील काही मागाहून पुन्हा सुरू करण्यात आले. आसाम राज्याच्या अर्थव्यवस्थेत चहाच्या मळ्यांना महत्त्वाचे स्थान आहे. ते बंद पडू लागल्यास राज्यांत आर्थिक दुरवस्थेचा मोठ्या प्रमाणावर फैलाव होण्याची भीती वाटत आहे. दिवसेंदिवस आर्थिक दृष्ट्या घसरणीस लागलेल्या आजारी मळ्यांची संख्या वाढत चालली आहे. तथापि, ह्या मळ्यांच्या कारभारात सुधारणा करण्याचा कायदेशीर अधिकार राज्य सरकारला नाही. त्यामुळे एका मागून एक मळे बंद पडत असताना राज्य सरकार काहीच करू शकत नाही. १९७१ साली राज्य सरकारने मळ्यांच्या कारभारासंबंधी एक बिल तयार करून ते मध्यवर्ती सरकारकडे पाठविले होते. चहाच्या मळ्यांच्या कारभाराची चौकशी करून त्यांच्या चालकांना आदेश देण्याची सत्ता राज्यसरकारला देण्यासाठी बिल तयार करण्यात आले होते. परंतु मध्यवर्ती सरकारने ह्या बिलाचा विचार करण्याचे नाकारले. कारण, राज्यघटनेप्रमाणे चहाचे मळे मध्यवर्ती सरकारच्या अखत्यारीतील बाब आहे. त्यानंतर भारत सरकारच्या व्यापार खात्याने अशा बिलाची आवश्यकता मानली होती. परंतु अद्याप असे बिल मांडण्यात आलेले नाही. त्यामुळे चहा मळ्यांतील कामगार अस्वस्थ झाले आहेत.

---

## घराबाहेर जेवणारांच्या संख्येत वाढ

कोणत्याही मोठ्या शहरांत रोज घराबाहेर जेवणारांची संख्या कमी-अधिक प्रमाणात असतेच. गेल्या दहा वर्षांच्या अवधीत कलकत्ता शहरात अशा लोकांच्या संख्येत वाढ झालेली आढळून आली आहे. धान्यवाटपात मिळणारे अपुरे धान्य आणि वाढती महागाई ही कारणे त्यासाठी दाखविता येतीलच; पण त्याशिवाय मध्यम वर्गाच्या आणि त्याखालच्या थरांतील लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयीही ह्या बदलाला काहीशा कारणीभूत झाल्या आहेत. चांगल्या प्रतीची हॉटेल्स् आणि रेस्टॉरन्स ह्यांच्या दप्तरांत ज्या नोंदी करण्यात येतात त्यावरून असे दिसून येते की गेल्या दशकात सोयीप्रमाणे बाहेर भोजन घेणाऱ्यांच्या संख्येत ८ पट वाढ झालेली आहे. त्यातही ज्या क्षुधाशांतिगृहात दर जेवणाला १·८० पैसे ते दोन रुपये घेतात त्यांच्या ग्राहकांची संख्या अधिक प्रमाणात वाढली आहे. मध्य कलकत्त्यामधील एका हॉटेलच्या मालकाच्या माहितीप्रमाणे ज्यांच्या मागे कसला पाश नाही अशी जोडपी नेहमीच बाहेर जेवण्यास तयार असतात. काही जोडप्यांनी तर घरी स्वयंपाक-घर सजविण्याची खटपटही केलेली नाही. त्यांच्या मताप्रमाणे घरी स्वयंपाक करण्यापेक्षा बाहेर जेवणे स्वस्त तर पडतेच परंतु त्यामुळे त्यांच्या वेळातही बचत होते. शिवाय स्वयंपाकासाठी लागणारी इतर खटपटही त्यांना करावी लागत नाही. भात, डाळ आणि माशाची अगर अंड्याची करी बंगाली पद्धतीने घरी करावयाची तर निदान २·५० रुपये तरी खर्च करावे लागतात. पण हेच अन्न बऱ्याशा हॉटेलमधून १·७० रुपयापर्यंत मिळू शकते.

---

## मंगेशी देवस्थानाच्या विकासाची योजना

गोमंतकातील मंगेशी देवस्थानच्या महाजनांनी देवस्थानाचा विकास करण्याच्या एका योजनेवर विचार करून ती मंजूर केली आहे. योजना पुरी होण्यासाठी ९ ते १० वर्षांचा अवधी लागणार आहे. देवस्थानाला भेट देण्यासाठी येणाऱ्या प्रवाशांसाठी व भक्तांसाठी विश्रामस्थाने बांधण्यात येणार आहेत. त्याशिवाय एक शेतीशाळा आणि एक तंत्रविद्यालयही स्थापन करण्यात यावयाचे आहे. देवीच्या भक्ताकडून देवीसाठी खूप दागिने देण्यात येतात. त्यांची विक्री करून देवस्थानाचा विकास करण्यात यावा असे ठरविण्यात आले. देवस्थानाच्या चालकांजवळ सोन्याचे व चांदीचे अनेक दागिने नुसते पडून आहेत.

---

## रिझर्व्ह बँकेच्या वाढलेल्या व्याजाच्या दराचे पडसाद

रिझर्व्ह बँकेने आपल्या व्याजाच्या दरात वाढ करून ती ७ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत नेली. त्याचबरोबर बँकांनी द्यावयाच्या व घ्यावयाच्या व्याजाच्या दरांतही वाढ केली. ह्या कृतीचे अर्थशास्त्रीय पंडितांनी स्वागत केले आहे. परंतु प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार करणाऱ्या वित्तीय गटांनी ह्या कृतीच्या परिणामाबद्दल साशंकता व्यक्त केली आहे. सामान्य माणूस वाढत्या किमतींनी आधीच बेजार झालेला आहे. त्याला असे वाटते की व्याजाच्या दरांत करण्यात आलेली ही वाढ अखेर त्याच्याच माथी मारण्यात येण्याचा दाट संभव आहे. रिझर्व्ह बँकेचा वाढलेला दर आणि ३१ जुलैला मांडण्यात आलेले नवे अर्थविधेयक ह्यांचा परिणाम शेअर बाजारावर होऊन चांगल्या मजबूत शेअर्सचे भावही घसरले. बँकांनी ठेवीवर द्यावयाच्या व्याजाच्या दरांत केलेल्या वाढीचे सामान्यतः स्वागत करण्यात आले आहे. खुद्द बँकिंग व्यवसायांतील मंडळींच्या मते ही वाढ ह्यापूर्वीच करावयास हवी होती. बँकांमधील ठेवींवरील व्याजाचे दर आता अधिक आकर्षक करण्यात आले आहेत. अलीकडे बँका आणि खासगी कंपन्या ह्यांच्यांत ठेवी मिळविण्यासाठी उघडउघड स्पर्धा चाललेली होती. ठराविक मुदतीच्या ठेवींना अधिक दराने व्याज देऊन कंपन्या ठेवी आपणाकडे ओढण्याचा प्रयत्न करीत होत्या. त्यामुळे बँकांकडे जाणाऱ्या ठेवींचा ओघ मंदावला असण्याची शक्यता आहे. तेव्हा हा ओघ सरकारच्या मालकीच्या व नियंत्रणाखाली असणाऱ्या बँकांकडे वळविण्यात सरकारला आस्था वाटत असावी. तरीपण बँकांपेक्षा अधिक दराने ठेवी मिळविण्याचे प्रयत्न खासगी कंपन्या केल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणजे पहिली स्पर्धा पुन्हा चालू होईल असे दिसते.

---

## नफ्यावरील निर्बंधाचा युनिट ट्रस्टवर अल्प परिणाम

मध्यवर्ती सरकारने चलनफुगवट्याला आळा घालण्यासाठी काही वटहुकूम अमलात आणले आहेत. त्यातील एका हुकुमाने कंपन्यांकडून लाभांशाचे जे वाटप होते त्यावर निर्बंध घालण्यात आला आहे. ह्या निर्बंधाचा युनिट ट्रस्ट रोख्यावर काय परिणाम होईल ह्यासंबंधी ठराविक उत्पन्नाच्या लोकांच्या गटांत म्हणजे प्रामुख्याने मध्यमवर्गात चर्चा चालू आहे. कारण, ह्या रोख्यांमध्ये पैसे गुंतविणारे लोक एकंदरीने ह्याच वर्गातील म्हणजे चाकरमान्या वर्गातील आहेत. ह्या विषयासंबंधी बोलताना युनिट ट्रस्टचे अध्यक्ष एजंटांच्या सभेत म्हणाले की सर्वसाधारण भागांवर द्यावयाच्या नफ्यावर नियंत्रण बसविण्यात आल्याने, युनिट ट्रस्टने सर्वसाधारण भागांत गुंतविलेल्या भांडवलापासून मिळणाऱ्या नफ्यावर थोडासा परिणाम होईल ह्यात शंका नाही. तथापि, ट्रस्टच्या एकूण उत्पन्नावर त्याचा परिणाम फारसा होणार नाही. युनिट ट्रस्टच्या भागाची सध्याची किंमत सुमारे १२ रुपये आहे. नफ्यावरील निर्बंधामुळे ट्रस्टचे भाग विकण्यासाठी परत येऊ लागले तर ते १०·५० रुपयांना विकत घेण्याची तयारी दाखविण्यास अडचण पडणार नाही. अर्थात मोठ्या प्रमाणावर फेरविक्रीसाठी भाग येतील असा संभव नाही. युनिटच्या रोख्याच्या किमतीत थोडीफार घट झाली तरी परिणामी त्याची किंमत ११·५० रुपयाच्या खाली जाण्याची शक्यता नाही. युनिट ट्रस्टने आपले पैसे विविध प्रकारच्या गुंतवणुकीत पसरून ठेवलेले आहेत. शिवाय अग्रहक्काच्या भागांत आणि डिबेंचर्समध्ये पैसे गुंतविण्यात आलेले आहेत. अल्पमुदतीच्या कर्जातही बरीच रक्कम गुंतविण्यात आलेली आहे. त्यामुळे नफ्यावरील निर्बंधाचा धक्का युनिट ट्रस्ट सहज सहन करू शकेल.

---

## स्वयंपाक करण्याची हिंदी पद्धतच चांगली

हिंदी समाजात पाश्चात्यांच्या रीतीरीवाजांचे अनुकरण करणारा एक मोठा वर्ग आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ज्यांना आर्थिक समृद्धी येनकेन प्रकारेण लाभली त्यांच्यांत तर ही मनोवृत्ती चांगलीच जोरावलेली आहे. स्वयंपाक घरातील कामे बसून करण्याची पद्धत भारतात आहे, तर उलट ही कामे उभ्याने करण्याची पद्धत पाश्चात्त्य घरातून रूढ आहे. कलकत्ता विद्यापीठातील शरीरव्यापारशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या एका विद्यार्थी गटाने ह्या संबंधी काही संशोधन केले आहे. संशोधनाच्या अखेरीस काढण्यात आलेला निष्कर्ष असा आहे की जमिनीवर बसून स्वयंपाक करण्याची हिंदी पद्धतच पाश्चात्त्य पद्धतीपेक्षा अधिक शास्त्रीय आहे. ज्या स्त्रिया स्वयंपाकघरातील कामे उभ्याने करतात त्यांच्या रक्तदाबात अनियमितपणा निर्माण होण्याचा संभव अधिक दिसून आला. त्याशिवाय त्यांच्या शरीरातील धमन्या अधिक ताठर होण्याचीही अधिक शक्यता दिसून आली. अलीकडे सर्वच मध्यमवर्गीय घरातून जेवणाच्या टेबलाने आपले स्थान पक्के केले आहे. ह्या पद्धतीला सामाजिक प्रतिष्ठेचा आधारही लाभलेला आहे. जेवणाची हिंदी पद्धत म्हटली म्हणजे पाटावर बसून जेवण्याची. ह्या पद्धतीत वाढणाऱ्याला वाकून वाढावे लागते हा मोठाच दोष असला तरी जेवणाराच्या दृष्टीने हीच पद्धत अधिक सोयीची आहे, असा निष्कर्ष अभ्यास विद्यार्थ्यांनी काढला आहे. एकंदरीत जे जे पाश्चात्त्य ते ते चांगले, असे मानणाऱ्यांनी स्वतः आत्मपरीक्षण केले आणि पाश्चात्त्यांकडून सोयीचे पण शास्त्रीय निकषावर टिकणारे रीतिरिवाज स्वीकारले तर ते अधिक चांगले आणि स्वाभिमानास पोषक होणारे होईल.

---

**जुन्या तोफेची मोडतोड** – जुनागड येथील किल्ल्यात असलेल्या एका जुन्या तोफेची मोडतोड झालेली आढळून आली आहे. जुन्या ओतकामाचा नमुना म्हणून तिला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले होते. मुळात ही तोफ इजिप्तमध्ये १५३१ साली ओतण्यात आलेली आहे. नंतर एका तुर्की दर्यावर्दीने ती १५८८ साली गुजरातमध्ये आणली. पोर्तुगीजांशी लढण्यासाठी तिचा उपयोग करण्यात आला.

## आमच्या प्रभूच्याने तरी आमचे मन कसे मोडवेल बरे ?

### सुशिक्षितातील मद्यपानाचे वाढते दुर्व्यसन

"मद्यप्राशनाचा विषय हाती घेऊन, आमच्या लोकांचेच मूर्खत्व विवेचिण्याचा प्रसंग आला, ही गोष्ट मोठी शरमेची आहे; पण तीस इलाज नाही. आमच्या लोकांत आणि त्यांतून विद्वान व सुधारलेले म्हणविणाऱ्या मंडळीत, जे अत्यंत लज्जास्पद व हानिकारक दुर्व्यसन प्रविष्ट होऊ पाहात आहे, त्याच्यासंबंधाने चार शब्द लिहिल्यावाचून राहावत नाही. अलीकडे इंग्रजी विद्येची प्रवृत्ती इकडे झाल्यापासून, तज्जनित दुर्विकार लोकांत दृष्टीस पडू लागले व आमच्या मद्यप्रिय मंडळीस चोरून कोणीकडे मध्यरात्री सुरोपासना करण्याची जरूर राहिली नाही. समुद्रमंथनकाळी जशी अमृत, विष व मद्य ही तिन्ही रत्ने एकदम प्रादुर्भूत झाली, त्याप्रमाणेच आंग्लभौम विद्योदधीतून ज्ञानामृत, दुर्ग्रहविष व साक्षात मद्य या तिन्हींचा एका कालीच आम्हास लाभ झाला, असे म्हणावयास हरकत नाही. त्यांत केवळ ज्ञानामृताचेच चाहाते व भोक्ते असे थोडेच निघाले. अमृताच्या अंशाबरोबर ज्यांच्या अंतकरणास वरील विषाने थोडाबहुत तरी झोंबला नाही, असे विरळाच. त्यांतून या कालकूटाचा अर्क जी सुरा, तिने तर पुष्कळच भक्त आपल्या चरणी लोळविले. फार तर काय ? पण ज्या बेट्यांस सुधाविषमय पात्राचा फारसा योग घडला नाही, त्यांच्या वाट्यास तर त्याच्यावर आलेला फेसच केवळ आला, मग तोच चाखून, तेवढ्यानेही आलेल्या लहरीत ते रथ्योदकनिमग्न (रस्त्यावरील वाहत्या पाण्यात-गटारात) तल्लीन झाले! आपल्या दयाळू सरकारचे मुख्य लक्ष आपली पोतडी भरण्यावर; यास्तव श्वेतद्वीपजन्य द्राक्षावल्लीतून आमच्या आर्यबंधूंनी काढलेला अर्वाच्य सोमरस, त्याचे आनंदाने सेवन करून, आम्ही जर मोठ्या खुबीने सरकारी खजिन्यात भर टाकीत आहो, तर आमच्या प्रभूच्याने तरी आमचे मन कसे मोडवेल बरे ?"

विष्णु कृष्ण चिपळूणकर ह्यांच्या 'अनुकरण' ह्या १६ ऑगस्ट, १८८१ च्या 'केसरी' मधील लेखाचा हा उतारा आजही उद्बोधक वाटतो. ह्या काळातील इंग्रजी विद्येचा दुर्विकार म्हणून मद्यपान सुशिक्षितात फैलावले; त्याला उद्देशून शास्त्रीबुवांनी वरीलप्रमाणे स्पष्टपणे लिहिले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची वृद्धी झाली, कंपन्यांचे व्यवहार वाढले, अमाप नफे होऊ लागले, काळा पैसा वाढू लागला आणि खर्चावरही बंधने उरली नाहीत. त्यामुळे, औद्योगीकरणाचा दुर्विकार म्हणून मद्यपानास खूपच मोठी चालना मिळाली. चिरिमिरी, चहाचिवडा, ह्यांची जागा आता मद्याने घेतली आहे आणि कंपन्यांच्या खर्चाने आणि मालकांच्या प्रत्यक्ष प्रोत्साहनाने ही सरबराई चालू असली म्हणजे मद्यपानाला ताळतंत्र राहात नाही. मद्यपान जीवनाचा एक आवश्यक भाग बनू पाहात आहे आणि प्राध्यापकासारखे सामान्यतः भितरे लोकही मद्यपानाच्या द्वारा आपली कामे करून घेऊ लागले आहेत आणि दुसऱ्यांची कामे करून मद्य मिळवीत आहेत. मद्यपानाच्या आहारी गेलेले सुशिक्षित स्त्री-पुरुष आणि श्रीमंत लोक ह्याची युनी तेवढ्यापुरती उभयपक्षी सुखावणारी असली तरी उभयतांच्या विनाशास कारण होऊ पाहात आहे.

मद्यपानामुळे सरकारी खजिन्यात तर भर पडतेच, परंतु त्याबरोबर कंपन्यांच्या मालकवर्गाचेही नफे वाढतात; निदान ते मिळविण्यास मदत होते. म्हणजे, सरकारची आणि उद्योगपतींची पोतडी भरण्यास मदत करणारे मद्यपान अधिकारीवर्गाला मात्र व्यसनाधीन करून त्यांच्या कौटुंबिक अस्वास्थ्यास कारणीभूत होत आहे. शास्त्रीबुवांच्या शब्दांत थोडासा बदल करून म्हणावयाचे तर ह्या अर्वाच्य सोमरसाचे आनंदाने सेवन करून आम्ही जर मोठ्या खुबीने सरकारी आणि कंपन्यांच्या खजिन्यात आणि मालकांच्या काळ्या पैशात भर घालीत आहो, तर आमच्या प्रभूच्याने तरी आमचे मन कसे मोडवेल बरे ?

---

### बांगला देशाला मालवाहू डब्यांचा पुरवठा

बांगला देशाला रेल्वेचे मालवाहू डबे पुरविण्यासंबंधी भारताशी वाटाघाटी चालू आहेत. ५०० मालवाहू डबे आणि ५० प्रवासी डबे पुरविण्याचा विचार भारत करीत आहे. बांगला देशाला भारताकडून माल घेता यावा म्हणून अलीकडे भारताने त्या देशाला २५ कोटी रुपये कर्ज देण्याची व्यवस्था केली होती. ह्या कर्जातून रेल्वेच्या डब्यांची किंमत चुकविण्यात येण्याची शक्यता आहे. उभयता देशांमधील वाटाघाटी सफल झाल्या तर रेल्वेचे डबे बांगलाला पुरविण्याचा हा पहिलाच प्रसंग ठरेल. करार झाल्यास पुढील वर्षी डबे पुरविण्यास प्रारंभ होईल. बांगला देशाला सर्व प्रकारच्या रेल्वेच्या डब्यांची फार गरज आहे. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात रेल्वेच्या साहित्याची फार मोठी हानी झाली होती.

---

**शेणापासून गॅस तयार करा** — महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाने शेतकऱ्यांना गोबर गॅसयंत्र तयार करण्याचा सल्ला दिला आहे. ४ गुरांच्या शेणापासून ह्या यंत्राच्या साहाय्याने गॅस तयार करण्यात आल्यास त्यावर ५ माणसांचा स्वयंपाक होऊ शकेल आणि शिवाय शेतकऱ्याला बरेच खतही मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**काथ्याच्या वस्तूंची मोठी निर्यात** — भारतामधून काथ्या व त्यापासून तयार करण्यात आलेल्या वस्तू निर्यात होतात. १९७३–७४ साळात ह्या वस्तूंच्या निर्यातीसाठी १५·५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. परंतु प्रत्यक्ष निर्यात त्याहीपेक्षा अधिक करण्यात आली आहे. १९७२–७३ साली १४·९३ कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात करण्यात आली होती.

## सिव्हिल एंजिनिअर्समध्ये बेकारीची लाट

आधुनिक तंत्रविज्ञानात व त्याच्या व्यावहारिक उपयोगात भारत मागासलेला आहे आणि तरीही येथील एंजिनिअर्ससारख्या तंत्रज्ञांना नोकरी मिळणे दुरापास्त झाले आहे. एंजिनिअरिंगच्या विशेष ज्ञानशाखेत प्रावीण्य मिळविलेल्यांचीच ही व्यथा आहे असे नव्हे. सामान्यपणे सिव्हिल एंजिनिअर्सना अनेक प्रकारच्या बांधकामात नोकऱ्या मिळणे अधिक शक्य असते. पण आता त्यांचीही परिस्थिती अडचणीची होऊ घातली आहे. भारत सरकारच्या मालकीच्या अनेक औद्योगिक संघटनांतून सिव्हिल एंजिनिअर्सना मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात येत आहे. नवीन नव्हे तर अनुभवी एंजिनिअर्सही ह्या कपातीच्या लाटेत सापडले असून त्यामुळे चिंता करण्यासारखी परिस्थिती उद्भवली आहे. सर्व देशभर अशा कमी केलेला एंजिनिअर्सची संख्या शेकडोंनी मोजण्याइतकी वाढली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उत्तरार्धात ह्या प्रश्नाने प्रथम डोके वर काढले आणि तेव्हापासून त्याची तीव्रता वाढतच चालली आहे. हिंदुस्थान स्टील, हेवी एंजिनिअरिंग कॉर्पोरेशन, नेवेली लिग्नाइट कॉर्पोरेशन, इत्यादी औद्योगिक संघटनांतून अनेक सिव्हिल एंजिनिअर्सना कमी करण्यात आले आहे. एखादी औद्योगिक संघटना स्थापन झाली की तिच्यासाठी कराव्या लागणाऱ्या बांधकामात सिव्हिल एंजिनिअर्सना मुख्यत: घेण्यात येते. पण पुढे अशी परिस्थिती निर्माण होते की बांधकाम पूर्ण झाल्यावर इतक्या एंजिनिअर्सची गरज लागत नाही. अर्थातच जादा एंजिनिअर्सना काढून टाकण्या-शिवाय गत्यंतर नसते. बांधकाम पुरे झाल्यावर कोणत्याही संघटनेत देखभाळीसाठी एंजिनिअर्स लागतील तेवढेच. त्यांची संख्या बांधकाम चालू असतानाच्या पेक्षा अर्थातच कमी असते.

---

## बंगलोरमध्ये नवी सिनेमा थिएटर्स होणार नाहीत

सिमेंट आणि पोलाद ह्यासारख्या बांधकामाला लागणाऱ्या वस्तूंचा देशात तुटवडा आहे. तेव्हा थिएटरांच्या बांधकामासाठी त्यांचा पुरवठा करू नये असा नियम असावयास पाहिजे. पण मध्यवर्ती व राज्य सरकारांनी ह्याबाबतीत कडक निर्बंध घालणारे नियम अद्यापही केलेले नाहीत. इतकेच काय पण सध्याचे बांधकामाचे नियमही पाळण्यात येत नाहीत. ह्या पार्श्वभूमीवर बंगलोरमध्ये नवी सिनेमा थिएटर्स बांधण्यासाठी सिमेंट व पोलादाचे परवाने न देण्याचे म्हैसूर सरकारचे धोरण लक्षात भरण्यासारखे आहे. बंगलोर शहरात आजच ७५ थिएटर्स आहेत. त्या शहरापेक्षा तिप्पट लोकसंख्या असलेल्या मुंबई शहरात ११५ थिएटर्स आहेत. तेव्हा बंगलोरच्या लोकांना नव्या न होणाऱ्या थिएटर्सची टंचाई जाणवण्याचा संभव नाही. अर्थात ज्या पैसेवाल्यांना ती बांधावयाची होती त्यांची निराशा झाली तर नवल नाही.

---

## रेल्वे संपाच्या परिणामाचा हिशेब

गेल्या मे महिन्यात देशात झालेल्या अखिल भारतीय रेल्वे संपामुळे ६० कोटी रुपयांचे नुकसान झाले. संपात भाग घेतलेल्या १६,७४९ कामगारांना नोकरीतून मुक्त करण्यात आले. ६७७ कामगारांविरुद्ध शिस्तभंगानिमित्त उपाय योजण्यात आले. त्याशिवाय १९,८८३ कामगारांना अटक करण्यात आली. बेकायदा कृत्ये करण्याचा आणि रेल्वेच्या सामानाची नासधूस करण्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आलेला आहे. बडतर्फ कामगारांकी ४,९२३ कामगारांना पुन्हा कामगार रुजू करून घेण्यात आले आहे. अटक झालेल्यांपैकी १९,२०५ जणांना सोडून देण्यात आले आहे. अजून ६७७ कामगार तुरुंगांत आहेत. मध्यवर्ती सरकारचे रेल्वेमंत्री श्री. मिश्र ह्यांनी ही माहिती राज्यसभेत दिली आहे.

## वाघाची जात वाचविण्याचे प्रयत्न

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील सुधारलेला मानव निसर्ग व प्राणिसृष्टी ह्यांचा स्वार्थासाठी संहार करीत सुटला आहे. त्याचा परिणाम होऊन खुद्द मनुष्यजातीलाच धोका उत्पन्न झाल्याचा इशारा शास्त्रज्ञ देत आहेत. पृथ्वीवरील अनेक जातींचे वन्य पशु-पक्षी माणसाच्या हिंस्रपणामुळे नामशेष होत आहेत अगर झाले आहेत. भारतामधील वाघांना वाचविण्यासाठी भारत सरकारने १९७३ साली वाघ बचाव मोहीम सुरू केली. प्रारंभी उत्तरप्रदेशा-तील जिम कॉर्बेट अभयारण्यापुरतीच मर्यादित असलेली मोहीम आता आणखी ८ अभयारण्यांना लागू करण्यात आली आहे. भारतामधील वाघांची संख्या आता अवघी २ हजारांच्या घरात आहे. वाघांची चोरटी शिकार अजूनही चालू आहे. कारण, वाघाच्या कातड्याच्या एका कोटाची किंमत न्यूयॉर्कमध्ये १० हजार डॉलर्स आहे.

---

## चोरलेली कलापूर्ण विष्णुमूर्ती परत केली

कलकत्ता येथील वंगीय साहित्य परिषदेच्या वस्तुसंग्रहालयातून १९६५ साली भगवान विष्णूच्या तीन कलापूर्ण मूर्ती चोरीस गेल्या होत्या. सर्वच मूर्ती अत्यंत कलापूर्ण होत्या. त्या अकराव्या शतकातील असाव्या असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्यांपैकी एक मूर्ती बोस्टन येथील कलावस्तूंच्या संग्रहालयात आढळून आली. संग्रहालयाच्या चालकांनी ती भारताला परत दिली आहे. भारतामधून प्राचीन कलापूर्ण पुतळ्यांची चोरी करून त्यांची परदेशात विक्री करण्याचा धंदाच चालू आहे. बोस्टनच्या संग्रहालयाच्या चालकांनी ही विष्णुमूर्ती बाजारात खरेदी केली होती. मूर्तीची किंमत म्हणून त्यांनी ५० हजार डॉलर्स अथवा चार लक्ष रुपये मोजले होते.

---

## विकट आर्थिक परिस्थितीची एक कारणमीमांसा

हिंदच्या सध्याच्या विकट आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढण्याचे जोराचे प्रयत्न सरकारतर्फे करण्यात येत आहेत. चिंताजनक आर्थिक परिस्थितीबद्दल सर्वांचे एकमत असले तरी तिला कारणीभूत असलेल्या घटकांबद्दल निरनिराळे मतप्रवाह दिसून येतात. पूर्वी नियोजन मंडळाचे सभासद असलेले डॉ. मिन्हास ह्यांनी आपल्या परीने एक कारणमीमांसा केली आहे. ते म्हणतात की, देशाच्या अर्थव्यवस्थेची चलनवाढीच्या व वाढत्या किमतीच्या पकडीतून सुटका करण्याचा एकच मार्ग आहे. देशातील शेतीच्या उत्पादनाच्या वाढीची संतुलित योजना आखून तिची अमलबजावणी करण्यात आली पाहिजे आणि त्याच-बरोबर नित्य लागणाऱ्या आवश्यक वस्तूंच्या वितरणाची कार्यक्षम व्यवस्थाही चालू करण्यात आली पाहिजे. तरच चालू परिस्थितीची कोंडी मोडणे शक्य होईल. सध्या चलनपुरवठ्याचा विस्तार अतिशय वेगाने होत आहे. चलनपुरवठा आणि काळ्या पैशाची वाढ ह्या दोन कारणांनी हा वेग समजण्यासारखा नाही. समजा अन्नधान्याचे उत्पादन २० टक्क्यांनी वाढले आणि चलन-पुरवठा १० टक्क्यांनी कमी करण्यात आला. तरीही किमतीही वाढतच जातील. शिवाय दुसरे असे की बहुतेक काळा पैसा ह्या ना त्या मार्गाने पांढऱ्या म्हणजे कायदेशीर पैशात रूपांतर पावत असतो. अर्थात ह्याचा परिणाम होऊन मुख्यतः अनावश्यक वस्तूंच्या किंमती चढत जातात. सरकारचे पैसा स्वस्त करण्याचे व रोजगाराच्या धडक योजना अमलात आणण्याचे धोरण चलन-वाढीला मूलतः जबाबदार आहे. वेतन आणि उत्पन्न ह्यासंबंधी धोरण आखूनच केवळ वाढत्या किमती व चलनवाढ ह्यांच्यामुळे उत्पन्न झालेला प्रश्न सुटणार नाही. कारण देशातील बहुतेक लोक रोजंदारी करून वेतन मिळविणारे नसून स्वतःच्याच उद्योगात गुंतलेले आहेत.

१९६० च्या सुमारास वेतनावर अवलंबून असणाऱ्याचे जे खरे उत्पन्न होते त्यात आता १० ते १५ टक्क्यांची घट झालेली आहे आणि खऱ्या उत्पन्नाची घसरगुंडी होण्याच्या ह्या प्रवृत्तीची वाट-चाल थांबण्याची चिन्हे अजून तरी दिसत नाहीत. सरकारने चलनवाढीविरुद्ध अलीकडे काही वटहुकूम काढले आहेत. ही चांगली गोष्ट आहे. सुमारे वर्ष सव्वावर्षानंतर का होईना पण सरकारने चलनवाढीविरुद्ध पावले टाकण्यास प्रारंभ केला आहे. तथापि, ह्या उपाययोजनेचा काय व कितपत परिणाम होईल ह्या-विषयी शंका घेण्यास बरीच जागा आहे. अलीकडे रिझर्व्ह बँके-कडून व्यापारी बँकांना देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाच्या दरात वाढ करण्यात आली आहे. ही घटना स्वागतार्ह असली तरी अपुरी आहे रिझर्व्ह बँकेने व्याजाच्या दरात अवघी २ टक्के वाढ केली आहे.ही वाढ अत्यंत अपुरी आणि अर्थशून्य आहे. व्याजदराची ह्यापेक्षा अधिक जबर वाढ करणे आवश्यक आहे. गव्हाच्या खरेदी-वर आणि वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. ते सर्व रद्द करण्यात आले पाहिजेत. असे केले तर शेतकरी आपल्याजवळील गव्हाचे साठे बाजारात आणतील आणि त्यामुळे गव्हाच्या किमती सप्टेंबरच्या सुमारास खाली येतील, इतकेच नाही तर बाजारातील गव्हाचा पुरवठाही बराच सुधारेल. सध्या गव्हाच्या खरेदीसंबंधी व वाहतुकीसंबंधी असलेले निर्बंध मुख्यतः मध्यम प्रतीच्या व छोट्या शेतकऱ्याला मारक होत आहेत. त्यामुळे त्यांच्याजवळील गहू बाजारात येत नाही. उलटपक्षी बड्या शेतकऱ्याला माल विकण्याची घाई नसल्याने त्याला गव्हावरील निर्बंध फायद्याचेच ठरत आहेत. देशातील मोलमजुरी करून पोट भरणारांची संख्या बरीच लवचिक आहे. त्यामुळे वेतन व उत्पन्नाच्या धोरणाचा त्यांच्यावर परिणाम होणार नाही. उलट लाचलुचपत आणि भ्रष्टाचाराच्या उच्चाटनाला त्याचा अडथळाच होईल.

---

## अणुशक्तीचा शांततामय कामासाठी उपयोग

राजस्थानच्या वाळवंटातील पश्चिमेच्या भागात भारताने १८ जानेवारीला अणुस्फोट केला. त्याचे पडसाद भारताप्रमाणेच परदेशांतही उमटले. स्फोटासाठी वापरण्यात आलेले इंधन कसे मिळविले ह्यासंबंधी शंका व्यक्त करून अणुशक्तीच्या विकासा-साठी देण्यात येणारी मदत कॅनडाने बंद केली. पाकिस्तानने स्फोटाचे निमित्त करून भारत व पाकिस्तान ह्यांच्यामधील संबंध सुधारण्याच्या कामाला खीळ घातली, पश्चिम जर्मनीने मात्र भारताच्या अणुशक्तीविषयक धोरणाला पाठिंबा दिला आहे. भारत अणुशक्तीचा वापर शांततामय कामासाठीच करील असा विश्वास पश्चिम जर्मन सरकारने व्यक्त केला आहे. अणुशक्तीच्या शांततामय उपयोगासंबंधी एक लेख भाभा अणुशक्तीकेंद्राच्या एंजिनिअरिंग विभागाच्या प्रमुखाने लिहिला आहे. ते म्हणतात, "उत्तर भारतामधील नद्यांना भयंकर पूर येऊन दरसाल मोठे नुकसान होते; तर दक्षिण भारतामधील कित्येक नद्या पावसाळ्यातही भरून वहात नाहीत. ही परिस्थिती सुधारण्या-साठी उत्तर भारतामधील गंगा नदी कालव्याच्या साह्याने कावेरी नदीला जोडण्याची कल्पना जुनी आहे. पण ती प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी अमाप खर्च करावा लागेल. शिवाय अनेक प्रकारच्या तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागेल. राजस्थानात करण्यात आलेल्या भूमिगत अणुस्फोटामुळे अशा स्फोटांचा कालवे खणण्यासाठी उपयोग करण्यात येण्याची शक्यता दृष्टि-पथात आली आहे. ह्या स्फोटाचा अभ्यास अद्याप पूर्ण व्हावयाचा आहे. परंतु अणुशास्त्रज्ञांचा असा दावा आहे की, नियंत्रित अणुस्फोटाचा उपयोग अनेक कामासाठी करता येईलच. भूमिगत नैसर्गिक वायू व तेल ह्यांची उपलब्धता सुलभ करण्याचे कार्य अणु-स्फोटाने करता येण्यासारखे आहे." ह्या पैकी कोणताही उपयोग साध्य झाला तरी भारताला अणुस्फोट वरदान ठरेल.

---

## जिराईत शेतीत छोटी तळी खोदण्याचा सल्ला

नेमेची येतो मग पावसाळा, ही उक्ती अलीकडे खोटी ठरू पाहात आहे. उलट, पावसाचा अनियमितपणाच अधिक अनुभवास येत चालला आहे. भारतामधील व त्यातल्या त्यात महाराष्ट्रातील जिराईत शेती सर्वस्वी पावसाच्या अनिश्चित पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे जिराईत शेतकऱ्यांच्या जीवनात एक प्रकारचा धोका कायमचा दडलेला असतो. ह्यावर प्रभावी तोडगा सापडलेला नाही. पण भूरक्षण शास्त्रज्ञांनी एक उपाय सुचविला आहे. पाऊस चांगला झाला म्हणजे शेतातून काही पाणी तरी वाहून जाते. ह्या पाण्याच्या प्रवाहाची दिशा लक्षात घेऊन जिराईत शेतकऱ्यांनी आपल्याच शेतात पाण्याची छोटी तळी बांधावीत अशी सूचना त्यांनी केली आहे. शेतातून वाहून जाणारे पाणी ह्या छोट्या तळ्यात साठविल्यास त्याचा उपयोग अधूनमधून पडणाऱ्या अवर्षणाच्या कालात करता येईल. शेतावर पडणाऱ्या पावसापैकी १० टक्के पाणी तरी अशा छोट्या तळ्यातून साठविता येईल. शास्त्रज्ञांनी सुचविलेले तळे ३० मीटर लांबीचे व तितक्याच रुंदीचे असून त्याची खोली सरासरी ५ मीटर धरली आहे. तळ्याचा तळ मात्र १७ मीटर लांब व तितकाच रुंद असावा असे त्यांचे म्हणणे आहे. अशा प्रकारच्या व लांबीरुंदीच्या तळ्यात पाणी साठविण्यात आल्यास १० हेक्टर जमिनीला पावसात वाजवीपेक्षा अधिक काळ खंड पडल्यास योग्य वेळी पाणी देणे शक्य होईल. ज्वारीसारखी काही पिके अशी असतात की त्यांना योग्य वेळी पाण्याचा पुरवठा झाला नाही तर ती जळून जातात. ह्या पिकांना जर तळ्यात साठविलेले पाणी देण्यात आले तर त्यांचे पीक चांगले फोफावून जवळजवळ दुप्पट येते असा अनुभव आलेला आहे. शिआतील काही भागात शेतांतच अशी तळी खोदण्याची प्रथा आजही आहे.


---

## पराभूत सेनानींची खुमखुमी

१९७१ साली भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या युद्धात पाकिस्तानी लष्कराचे ढाक्यातील सरसेनापती जनरल निआझी होते. त्यांनी पाकिस्तानातील चौकशी मंडळाकडे आता आपली जबानी दिली आहे. ते म्हणतात की पूर्व पाकिस्तानात झालेल्या पराभवाची सर्व कारणे मला उघडपणे सांगता येण्यासारखी नाहीत. परंतु पराभवाचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे पूर्व बंगालमधील स्थानिक जनतेने पुकारलेला असहकार हे आहे. त्या वेळी शरणागती स्वीकारलेल्या लष्कराला अजूनही संधी मिळाली तर पराभवाचे उट्टे काढण्याची त्याची तयारी आहे. ढाक्यात पकडण्यात आलेल्या ९० हजार पाकिस्तानी सैनिकांना भारताने गेल्याच वर्षी मायदेशी परत पाठविले आहे. त्यांच्यातील कडवटपणाची ही खूणच म्हटली पाहिजे.

---


"भिडे" ओव्हर पिक
पॉवर लूम्स ५६," ६०" व ६४"



भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि;
—सांगली—
रघुनाथराव भिडे
कार्यकारी संचालक
फोन नं. २०६१






नोगी सेल्स् कॉर्पोरेशन

## करचुकारांविरुद्ध चालविलेली मोहीम

महागाईला आळा घालण्यासाठी भारत सरकारने चलनवृद्धी-विरोधी वटहुकूम काढले. ह्या वटहुकुमांच्या जाळ्यात फक्त पगारदार लोक सापडतात अशी टीका करण्यात आली. तेव्हा स्वतंत्र व्यावसायिकांनाही करवसुलीच्या जाळ्यात अडकविण्यात येणार आहे असा खुलासा सरकारतर्फे करण्यात आला आणि त्याप्रमाणे डॉक्टर्स, वकील, चार्टर्ड अकौंटन्टस्, एंजिनिअर्स, कॉन्ट्रॅक्टर्स, ह्यांच्याकडूनही कर वसूल करण्याचे प्रयत्न सुरू झाले. ह्याबाबतच्या आकडेवारीवरून असे दिसते की, डॉक्टर्स व वकील ह्यांच्यात फारसे करचुकवे आढळले नाहीत. मुंबईमधील नोंदणी केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांची संख्या सुमारे १२ हजार आहे. त्यांपैकी ६,४५४ व्यावसायिक प्राप्तीवरील कर भरत होतेच. आणखी १,६१४ वैद्यकीय व्यावसायिकांची प्रकरणे नव्याने उद्भवली आहेत. २,९७३ डॉक्टर्स सरकारी अगर निमसरकारी नोकरी करीत आहेत. तेव्हा त्यांचा प्राप्तिकर पगाराच्या वेळीच कापून घेण्यात येतो. काही डॉक्टर्सना मात्र प्राप्तिकरपात्र उत्पन्न नसल्याचे आढळून आले. डॉक्टर्सप्रमाणेच मुंबईतील वकिलांनाही प्राप्तिकराबद्दलच्या नोटिसा मोठ्या प्रमाणावर देण्याची जरूरी भासली नाही. बार कौन्सिलच्या दप्तरात ५,३८२ वकिलांची नोंद करण्यात आलेली आहे. त्यांपैकी ४,०९६ वकील कर भरत आहेतच. बाकीच्यांचे उत्पन्न करपात्र उत्पन्नापेक्षा कमी असल्याचे दिसून आले. उरलेल्या स्वतंत्र व्यावसायिकांपैकी ४२९ एंजिनिअर्सना, २७३ चार्टर्ड अकौन्टंटस्‌ना, १५२ कॉन्ट्रॅक्टर्सना व १४४ आर्किटेक्टर्सना प्राप्तिकरासंबंधीच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. आणखी ३१७ आर्किटेक्टर्सना नोटिसा देण्यात यावयाच्या आहेत. स्वतंत्र व्यावसायिकांकडून किती जादा कर मिळेल ते पुढे दिसेल.

## मोठा मासा गळाला कसा लागला ?

मुंबईमधील प्राप्तिकर अधिकाऱ्यांनी वाळकेश्वर भागातील एका मोठ्या अलिशान राहण्याच्या जागेवर अकस्मात झडप घालून सुमारे १० लाखांच्या नोटा व लक्षावधी रुपयांचे जडजवाहीर उजेडात आणले. अलीकडे मोठ्या किमतीच्या नोटा रद्द होणार अशा अफवा मधूनमधून पसरत असतात. त्यांचा ह्या फ्लॅटच्या मालकावर परिणाम झाला होता. सावधगिरी म्हणून भारी किमतीच्या नोटा छोट्या किमतीच्या नोटांत बदलून घेण्याचा सपाटा चालविला होता. ह्या प्रकाराची कुणकुण अधिकाऱ्यांना लागताच त्यांनी जाळे पसरून डाव टाकला. ज्या इमारतीत हा फ्लॅट होता त्यातील झोपण्याच्या खोलीत मोठ्या कौशल्याने एक छुपी तिजोरी भिंतीत बसविण्यात आली होती. त्यात सर्व काही दडविलेले होते. दहा लाखांच्या नोटांत बहुसंख्य नोटा १, २, ५, १०, व २० रुपयांच्या होत्या.


धनवर्धिनी परंपरेतील
११ ४ नवीन योजना
कर्जहमी ठेव योजना
ठेव परतीचे वेळी तितकेच कर्ज मिळण्याची सुरवातीलाच हमी
विशेष सेव्हिंग्ज खाते
८.७५ टक्के व्याज, पैसे काढताना ९१ दिवसाची पूर्व सूचना.
मुदतीचे सेव्हिंग्ज खाते
७.२५ टक्के व्याज
मुदत ३ ते ६ वर्षे
मासिक व्याज ठेव योजना
किमान ९००० रु. (नव्या स्वरूपात)
कमीत कमी ९ वर्ष मुदत.
युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन
एका राज्यात शाखा असलेल्या बँकांमधील भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कार्यालय: युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा १.

'किर्लोस्कर पंप' हेच ना ? हे पाणी खूप दूरचा प्रवास करीत आलं आहे. मोठ्या नळातून मैलांचे अंतर तोडीत... पण त्याला खेचीत आणलं कोणी ? अर्थातच 'किर्लोस्कर पंपांनी' आणि आता ते आपल्या हाताजवळ नळात आहे.

पाणी पुरवठा... 'किर्लोस्कर पंपांचं' हे अत्यंत महत्त्वाचं काम. अनेक लहान मोठ्या शहरात, रात्रंदिवस, 'किर्लोस्कर पंप' हे काम करीत आहेत.

दुसरीहि अनेक कामं 'किर्लोस्कर पंप' करतात. शेतीसाठी आणि औद्योगिक उपयोगासाठी पाणी पुरवठा करणं, तसेच सांडपाणी खेचणं ही कामंसुद्धा ते करीत असतात.

'किर्लोस्कर पंप' अनेक प्रकारचे आहेत... छोट्या मोनोब्लॉकपासून मोठ्या व्हर्टिकल टर्बाइन पंपांपर्यंतचे विविध प्रकार... छोट्या अगर मोठ्या, शहरी अगर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी, गरजेनुसार यथायोग्य पंप. बरं, सुटे भाग सहज मिळतात. शिवाय विक्रीपूर्व आणि विक्रीनंतरची देखभाल सेवाहि सर्वत्र मिळू शकते.



किर्लोस्कर


किर्लोस्कर पंप, सर्वोत्तम पंप

किर्लोस्कर ब्रदर्स लि.

उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-४११ ००२

कार्यालये : अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, कलकत्ता, नवी दिल्ली, इंदूर, जयपूर, मद्रास, सिकंदराबाद.

● Registered users : Kirloskar Brothers Ltd.



# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मनेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स – कुठेही नेसाल तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड, साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

## ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,

क्राउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१८, अपोलो स्ट्रीट, मुंबई – १.


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)